दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं./जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/ दिनांक : १५/०१/२०११.

## वृत्तपत्र टिप्पणी

## महानिर्मितीच्या चंद्रपूर येथील ४ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम सुरु होणार इरेडाशी वित्त पुरवठा करार संपन्न

महानिर्मिती कंपनीने चंद्रपूर येथे ४ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. या संदर्भातील निविदा प्रक्रिया आता पूर्ण होऊन कामाचे आदेश देण्यात आले आहेत. यापैकी २ मेगावॅट सौर प्रकल्प हा क्रिस्टलाईन फोटोव्होल्टाईक तंत्रज्ञानावर आधारित असून या कामाचे कंत्राट मेसर्स इंन्स्टट एनर्जी, मुंबई यांना तर उर्वरित २ मेगावॅट सौर प्रकल्प हा थिनफिल्म फोटोव्होल्टाईक तंत्रज्ञानावर आधारित असून या कामाचे कंत्राट मेसर्स मेघा इंजिनिअरींग आणि इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, हैद्राबाद यांना निविदा प्रक्रियेद्वारे देण्यात आले आहे.

प्रकल्प उभारणीला प्रत्यक्ष गती देण्याच्या दृष्टीकोनातून दिनांक १३ जानेवारी २०११ रोजी महानिर्मिती आणि महापारेषण यांच्यात चंद्रपूर येथील महानिर्मितीच्या महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरात, प्रस्तावित ४ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणा-या सुमारे ६१.३३ लक्ष युनिट विजेच्या वहनासाठी एक महत्त्वपूर्ण करार नुकताच मुंबई येथे संपन्न झाला. या करारप्रसंगी महापारेषणतर्फे व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह, श्री. वासुदेव अस्वार (संचालक - प्रकल्प), श्री. उत्तम झाल्टे (संचालक - संचालन), श्री. सोनकवडे (मुख्य अभियंता) तसेच महानिर्मितीतर्फे श्री. अशोक खोंडे (मुख्य व्यवस्थापक - सांघिक नियोजन), श्री. लक्ष्मीकांत अंबेकर (महाव्यवस्थापक) प्रामुख्याने उपस्थित होते.

या ४ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी एकूण सुमारे रू. ५२.५२ कोटी इतका खर्च येणार आहे. त्यापैकी भारतीय अक्षय ऊर्जा विकास संस्था सिमित (**इरेडा**), नवी दिल्ली. ह्या संस्थेने रू.३९.३९. कोटी (प्रकल्प किंमतीच्या ७५% रक्कम) चे अर्थ सहाय्य दि. १३ जानेवारी २०११ रोजी मंजूर केले आहे. उर्वरित २५% रकमेचे भांडवल महानिर्मिती स्वतःच्या अंतर्गत स्त्रोताव्दारे उभारणार आहे.

या प्रकल्पासाठी महानिर्मितीने एन.टी.पी.सी. विद्युत व्यापार निगम यांच्याशी दि. १५.१०.२०१० रोजी वीज खरेदी करार केला असून वीज खरेदीचा दर रू. १७.९१ प्रति युनिट असा ठरविण्यात आला आहे.

या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे भारतीय अक्षय ऊर्जा विकास संस्था सिमित (इरेडा), नवी दिल्ली यांनी मंजूर केलेला सौर ऊर्जा विद्युत निर्मितीचा भारतीय सरकारी क्षेत्रातील हा पहिलाच प्रकल्प आहे. तसेच, वीज खरेदी करारातील कलमानुसार सौर वीज वहनासाठी महापारेषण कंपनीचा हा पहिलाच करार आहे.

सदरहू प्रकल्पासाठी आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता महानिर्मितीतर्फे या आधीच पूर्ण करण्यात आली आहे. सदरहू प्रकल्प नियोजित वेळेत म्हणजेच जुलै २०११ पर्यंत पूर्ण करण्यासाठी महानिर्मिती प्रयत्नशील असणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर चंद्रपूर येथील सौर प्रकल्पाची क्षमता एकूण ५ मेगावॅट इतकी होणार आहे.

